**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

Original Article

# भारतीय राजकारण आणि महिलांचे स्थान

**प्रा.डॉ.अविनाश पांचाळ[1], प्रा.प्रमोद राऊत[2]**
[1]सहयोगी प्राध्यापक, शारदा महाविद्यालय परभणी
[2]संशोधक विद्यार्थी, ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी
**Email:** pramodrautpbn@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-171044
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 10
Pp. 208-210
October. 2025
**Submitted:** 20 Sept. 2025
**Revised:** 30 Sept. 2025
**Accepted:** 15 Oct. 2025
**Published:** 31 Oct. 2025

***सारांश***

*भारतीय समाज पितृसत्ताक असल्याने स्त्रियांची भूमिका मुख्यतः घरगुती जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित ठेवली गेली. स्वातंत्र्यानंतर लोकशाही व्यवस्था स्वीकारली असली तरी राजकारणात महिलांचे स्थान पुरुषांच्या तुलनेत कमी राहिले. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक भेद, कुटुंबातील जबाबदाऱ्या, आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव आणि राजकीय प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे महिलांचे राजकारणातील प्रतिनिधित्व मर्यादित राहिले आहे. महिला मतदार, कार्यकर्त्या व काही प्रमाणात निवडून आलेल्या प्रतिनिधी म्हणून सहभागी होत असल्या तरी नितीनिर्धारिणाच्या सर्वोच्च पातळीवर त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. 73वी–74वी घटनादुरुस्तीप्रमाणे स्थानिक स्वराज्यातील आरक्षणाने परिस्थितीत बदल झाला असला तरी संसद व विधानसभांमधील महिला आरक्षण विधेयक अद्याप प्रलंबित आहे. राजकारणातील महिलांच्या कमी सहभागाची मुख्य कारणे म्हणजे घरगुती भार, राजकीय संस्कृतीतील गुंतागुंत, आर्थिक साधनांची कमतरता, चारित्र्यावर शंका घेण्याची प्रवृत्ती आणि स्त्रीत्वाबद्दलच्या रूढ कल्पना. तरीही आज महिलांचा राजकारणातील सहभाग वाढताना दिसतो. स्त्रीसक्षमीकरणासाठी समानता, न्याय, वैचारिक स्वातंत्र्य आणि घटनात्मक अधिकारांची अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.*

***मुख्य शब्द:*** *महिलांचे स्थान, पितृसत्ताक समाज, भारतीय राजकारण,महिला सहभाग,लोकशाही,निवडणूक राजकारण,महिला आरक्षण,नितीनिर्धारण प्रक्रिया,स्त्री सक्षमीकरण,सामाजिक अडथळे,लिंग समानता.*

## प्रस्तावना

भारतातील पितृसत्ताक समाज व्यवस्थेत कन्या, पत्नी व माता या भूमिकातील स्त्रीची कर्तव्य स्पष्टपणे नमूद केलेली आहेत. स्त्रियांसाठी माता व पत्नी या भूमिका विशेष महत्त्वाच्या मानल्या आहेत. ध्वनितार्थ असा की या भूमिका विशेष मूलभूत व स्वयंपूर्ण आहेत आणि म्हणून स्त्रियांनी ज्ञानप्राप्ती, कलोपासना अगर इतर व्यवसायाच्या मागे धावू नये. चांगली स्त्री ही गोड, मृदू, प्रेमळ, काळजी वाहणारी आणि त्यागमूर्ती असते अशी पूर्वापार धारणा आहे. पण पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे स्थान काय हा भारतापुरता मर्यादित नसून हा जगभर चर्चेला जाणारा विषय आहे पुराण काळापासून आजपर्यंत या विषयावर वैचारिक मंथन होत राहिले आहे पण त्याचे नेमके एक उत्तर सापडलेले नाही जगातल्या प्रत्येक देशाची संस्कृती प्रकृती इतिहास चालीरीती मानसिकता आणि परिस्थिती वेगवेगळया आहे त्यामुळे प्रत्येक देशात पुरुषांच्या तुलनेत स्त्रीचे स्थान काय काही देशात महिलांना पुरुष स्वतंत्र आहे तर काही देशात त्यांना मुक्तपणे वाढण्याची कोणतीही मोकळीक नाही केवळ आपल्या भारत देशाचा विचार केला तरी लक्षात येते की भारताच्या प्रत्येक राज्यानुसार स्त्रियांकडे पाण्याचा दृष्टिकोन वेगवेगळया आहे तो एकसमान नाही पुन्हा आपल्याकडे ज्या वेगवेगळया जाती जमाती आहेत त्यांच्यातही महिलांना एकसारखी वागणूक मिळत नाही एकूणच हा विषय अत्यंत गुंतागुंतीचा आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.डॉ.अविनाश पांचाळ, सहयोगी प्राध्यापक, शारदा महाविद्यालय परभणी*

**How to cite this article:**
*पांचाळ, . अविनाश ., & राऊत, . प्रमोद . (2025). भारतीय राजकारण आणि महिलांचे स्थान. Journal of Research and Development, 17(10), 208–210. https://doi.org/10.5281/zenodo.17647697*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17647697
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

राजकीय पातळीवर जगभरातील देशांमधील परिस्थिती न्याहाळी तर लक्षात येते की राजकारणात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान महिलांना कोणत्याही देशात दिले जात नाही. राजकारणाचे स्वरूप हे प्रामुख्याने पुरुषप्रधान राहिले आहे व भारतीय त्याला अपवाद नाही.

आपल्या भारत देशाचा विचार केला गेल्यास भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताने आपला देशाचा राज्यकारभार व कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला. लोकांनी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही अशी लोकशाहीची व्याख्या असताना लोकशाही व्यवस्थेत राजकीय निर्णय घेण्यात कोणाचा सहभाग असतो हा सर्वात मूलभूत मुद्दा असतो. लोकशाहीत हा कळीचा प्रश्न असतो याचे उत्तर असे की जनतेच्या स्त्री व पुरुषांच्या इच्छेनुसार कोणी शासन चालवावे आणि उद्दिष्ट काय हे ठरत असते. आपल्या सहभागाच्या माध्यमातून नागरिक आपल्या आकांक्षा,अपेक्षा,गरजा व्यक्त करतात आणि लोकशाही दृढ करण्याचे ते महत्त्वाचे साधन असते .

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारतीय महिलांचा सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करणे.
२. भारतीय महिलांचा राजकीय सहभागातील अभ्यास करणे.

**महिला व निवडणुकीचे राजकारण**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक गोष्ट भारतीय महिलांच्या लक्षात येऊ लागली समतेची आश्वासने प्रत्यक्षात उतरण्याची प्रक्रिया सोपी, सरळ नाही. स्वातंत्र्य प्राप्तीच्या आनंदाचे उदान जसे ओसरू लागले तसे राजकारणाच्या गुंतागुंतीचे स्वरूप त्यांना स्पष्टपणे दिसू लागले. जात,भाषा,धर्म कुटुंबरेचनेतील भेद तसेच सांस्कृतिक परंपरा अशा विविध धाग्यांची त्यात गुंतागुंत असल्याची त्यांना जाणीव झाली.
भारतीय महिलांना जात,वर्ग, भाषा,प्रदेश, धर्म इत्यादींमुळे निर्माण होणाऱ्या अडथळयांची आणि या समस्या हाताळताना येणाऱ्या अनेक अडचणींची ही स्पष्ट कल्पना येऊ लागली. स्वातंत्र्य संग्रामात सहभागी होताना लैंगिक भेदाचा वाद कधी उपस्थित झाला नव्हता. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी होणाऱ्या लढ्यात महिला समाविष्ट झाल्या असल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास जागृत झाला होता, सत्तेची व जबाबदारीची पदे त्यांनी क्षमतेने सांभाळली होती आणि तरीही स्वातंत्र्यानंतर सत्तेची पदे सहजपणे त्यांच्या हाती येत नव्हती.

मतदार पक्ष कार्यकर्त्या, वेगवेगळया निवडणुकीत उमेदवार, कायदेमंडळात सदस्य, राज्य विधिमंडळातील सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्य, तसेच राजकीय मुद्द्यावरील विचारविमर्श आणि अल्प प्रमाणात नितीनिर्धारण प्रक्रिया अशा राजकारणाच्या विभिन्न अधिकृत माध्यमात महिला सहभागी होत आहेत. परंतु नितीनिर्धारणच्या उच्च पदापर्यंत आजवर फार थोड्या मोजक्याच महिला पोहोचलेल्या दिसतात. महिलांची स्थिती सुधारण्याची भरघोस आश्वासने सर्व राजकीय पक्ष देत असतात. महिलांच्या चळवळी आणि 1975 - 85 हे महिला दशक या झालेल्या घोषणामुळे राजकीय पक्षांच्या महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोणात काहीसा बदल झाला आहे. महिलांप्रती राजकीय पक्षाच्या दृष्टिकोनातही परिवर्तन झाले आहे, महिला म्हणजे केवल कल्याणकारी उपक्रमाच्या लाभार्थी नसून राष्ट्रीय विकास कार्यातील त्यांचा सहभाग मोलाचा आहे याची जाणीव राजकीय पक्षांना झाली.

त्यामुळे राजकीय पक्षांनी महिलांना राजकारणात प्रतिनिधी होण्याची संधी देण्यास सुरुवात केली. परंतु महिलांच्या निवडणुकीवर अनेक गोष्टींचा परिणाम होतो. उदाहरणार्थ साक्षरता उदारमतवादी कुटुंबाची पार्श्वभूमी, कौटुंबिक आर्थिक स्थिती, घरातील पुरुषांचा पाठिंबा, राजकारणाची आवड, स्थानिक परिस्थिती, प्रचारातील डावपेचांचे तंत्र, पक्षातील उच्चपदस्तांशी जवळीक, व्यक्तिमत्व इत्यादी. या सर्व बाबींचा संकलित परिणाम असा की फार थोड्या महिलांना उमेदवारी दिली जाते आणि त्यापैकी काही जणीच निवडून येऊ शकतात.

**महिलांसाठी आरक्षित जागा**

महिला आरक्षण धोरण हे अंतिम साध्य नव्हे तर लिंग समानता प्रस्थापित करण्याची ते एक साधन आहे. याच दृष्टीने या विषयाकडे पाहिले पाहिजे. नितीनिर्धारण प्रक्रियेत महिलांचीही मोठी संख्या असणे आवश्यक आहे. राजकीय क्षेत्रात महिलांच्या आवाजाची दखल घेतली जावी असे वाटत असेल तर त्यांचे संख्याबळ जास्त प्रमाणात शासकीय संस्थांमध्ये असणे गरजेचे आहे. राजकीय व्यवस्थेत महिलांना प्रवेश मिळाला तर या यशाबरोबर महिला चळवळींची पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि समर्पित भावना संपू नये. राजकीय घडामोडींची अवाढव्यता,गुंतागुंतीच्या प्रक्रिया, आग्रहीनिष्ठा आणि निर्घृण स्पर्धा यात आकंठ बुडून न जाता महिला चळवळींनी समता व महिला सक्षमीकरण या उद्दिष्टाप्रत आपली वाटचाल अविरत चालू ठेवायला हवी. हे कार्य प्रचंड मोठे खरे असले तरी अशक्य नाही. महिलांच्या सक्षमीकरणाकडे लोकशाही व्यवस्थेचा व्यापक संदर्भात बघणे गरजेचे आहे. यासाठी दैनंदिन जीवनात समता व न्यायाची मूल्ये समाजात तळापर्यंत झिरपत जायला हवीत, दडपशाहीच्या विरोधात नागरिकांच्या गटांनी निषेधाचा आवाज उठवायला हवा आणि शासकीय क्षेत्राने स्त्रीवादी दृष्टिकोनाला मान्यता द्यायला हवी.

यासाठी शासनाने देशाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचे संख्याबळ पाहिजे तेवढ्या प्रमाणात हवी असल्यास 73 व 74 व्या घटना दुरुस्ती अंतर्गत जसे स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना आरक्षण प्राप्त झाले तसेच आरक्षण महिलांसाठी विधिमंडळात व तसेच संसदेत आर्थिक जगाची व्यवस्था केली जावी अशी मागणी पुढे मांडली या मागणीच्या अनुरोधाने संविधानाच्या दुरुस्तीची 84 व 85 विधेयके संसदेत मांडण्यात आली त्यात लोकसभा आणि राज्य विधिमंडळातील एकूण जागांच्या एक तृतीयांश जागा अनुसूचित जाती व जमाती सह सर्व महिलांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात अशी तरतूद करण्यात यावी यासाठी त्यासंबंधित घटनादुरुस्तीचे विधेयक सर्वप्रथम 12

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

सप्टेंबर 1996 रोजी लोकसभेत मांडण्यात आले ते,परंतु काही राजकीय व सामाजिक अडचणींमुळे हे विधेयक तेव्हापासून ते आजतगत शीतपेटीत तसेच धुळखात पडून आहे.

**महिलांपुढील अडचणी**

राजकारणात महिलांच्या मर्यादित सहभागा मागील कारणाचा शोध घेणे दुष्कर नाही भिन्नस्तरावरील निर्णय प्रक्रियेत महिलांनी सहभागी होण्याच्या मार्गात अडथळे आहेत.राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा अल्प सहभागाला महिला स्वतः जबाबदार आहेत या क्षेत्रापासून त्यांनी स्वतःला अलिप्त ठेवले आहे असा युक्तिवाद कधी कधी केला जातो मुख्य समस्या अशी की महिलांच्याकडे चिकित्सकपणे पाहतांना तिला दोन निष्कर्ष लावले जातात आणि त्या स्वतःलाही या दोन निष्कर्षावर तपासात असतात पहिला निष्कर्ष स्त्रीत्वाचा आहे. वैयक्तिक खाजगी जीवनातील संगोपनकरणारी,निष्क्रिय,भावनाप्रधान, घरात रमणारी आणि पुरुषापेक्षा गौण व्यक्ती मानली जाते. दुसरा निष्कर्ष तिच्या आधुनिक भूमिकेचा आहे, सार्वजनिक व्यवहारीक जग तिने सक्रिय, विवेकवादी, कार्यतत्पर, महत्त्वकांक्षी व स्पर्धात्मक असावे अशी अपेक्षा करते. अशा परिस्थितीत त्यांच्या सन्मुख दोन पर्याय असतात,पहिल्या पर्यायांमध्ये राजकीय खेळींच्या नियमाचे तंतोतंत पालन करून "स्त्रीत्वहीन" म्हणून घेण्याची मानसिक तयारी ठेवणे आणि दुसरा पर्याय म्हणजे राजकीय क्षेत्रात वावरताना स्त्रीत्वाच्या नियमानुसार वागून पुरुषांपेक्षा ,गौण स्थान मान्य करणे.

या खाजगी व सार्वजनिक जीवनातील भेदामुळे आचरणाचा योग्य पर्याय निवडणे महिलांना अवघड जाते. याचबरोबर राजकीय क्षेत्रातील महिलांच्या मर्यादित सहभागाचे आणखी एक स्पष्टीकरण दिले जाते ते असे की त्यांच्या राजकीय जाणीवा विकसित झालेल्या नाहीत. परंतु हे तर्कशुद्ध वाटत नाही. कारण इतिहासात पाहता स्त्रियांनीही बेधडक व ऐतिहासिक व सक्रिय निर्णय घेतलेले आपल्याला दिसून येतात. समाजात महिलांना गौण स्थान दिले जात असल्यामुळे समाज व्यवस्था त्यांच्यावर बंधने पाडते आणि राजकीय कार्यात सहभाग घेण्यावर दोन प्रकारच्या अडचणी येतात. पहिली अडचण अशी कुटुंबातील कामाचे विभाजन लिंग आधारित असल्यामुळे सर्व घरगुती कामाचे ओझे स्त्रीला एकटीला झेलावे लागते. दुसरी अडचण म्हणजे आजची राजकीय संस्कृती आज राजकीय प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची झाली आहे आणि कित्येक राजकीय निर्णय उघडपणे नावे तर पडद्यामागे घेतले जातात आज राजकीय खेळी पैशाच्या बळाने नियंत्रित होतात आणि वित्तीय व्यवहारावर महिलांचे नियंत्रण नसल्यामुळे त्यांना या व्यवहारात सामील करून घेतले जात नाही. काही वेळा तर त्यांच्या चारित्र्यावर सुद्धा संशय घेतला जातो. अशा अनेक अडचणींमुळे महिला राजकारणात सहभागी होत नाहीत.

**सारांश**

महिला राजकारणात सक्रिय सहभाग घेत नाहीत,निवडून आल्यानंतर चर्चेत भाग घेत नाहीत किंवा कुटुंबाचा पाठिंबा असलेल्या व्यक्तीलाच त्या मत देतात ही विधाने आजतागतच्या परिस्थितीमध्ये बघत असता चुकीची ठरतात. ज्या प्रकारे विधिमंडळात किंवा संसदेत महिला महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करतात हेही देखील आपल्याला ध्यानात घ्यावे लागेल. जी स्त्री भारतीय संस्कृतीमध्ये चूल किंवा मूल या पुरतीच मर्यादित होती.आता थोड्या प्रमाणात का होईना हळूहळू राजकारणात सक्रिय होताना आपल्याला दिसून येत आहे. कोणत्या कारणामुळे त्यांच्या कार्यावर मर्यादा पडतात याची जाणीव सामूहिक रित्या महिलांनी ठेवली पाहिजे.त्याचबरोबर विषमतेवर आधारित सत्ताव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यास सामूहिक रित्या सातत्याने काम करणे गरजेचे आहे .वेगळा शब्दात सांगायचे तर सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचा अनुभव महिलांनी घ्यायला पाहिजे. ही प्रक्रिया स्वतःवर ताबा मिळवण्याची, वैचारिक धारणा आणि भौतिक साधने, मानवी, बौद्धिक व आर्थिक अशा सर्व संशोधनावर ताबा मिळवण्याची प्रक्रिया आहे या द्वारा सत्ता निर्धारित होते. यासाठी सरकारने त्यांना काही घटनाम्त्क विशिष्ट अधिकार देऊकरून राजकारणात सक्रियता वाढवण्यास मदत होईल असे, संसदेत व विधिमंडळातील महिला आरक्षित जागे संबंधित असलेले विधेयक संमत करून भारताच्या राजकारणावर सकारात्मक परिणाम घडवून आणण्यास प्रयत्न करावेत.असे केल्यावर निश्चितच महिलांना राजकारणात यश मिळेल.

**संदर्भसूची**

1. डॉ.शुभांगी गोटे-गव्हाणे.२००४. महिला सबलीकरण स्वरूप व समस्या. वरद पब्लिकेशन्स.
2. निरा देसाई, उषा ठक्कर, मराठी अनुवाद शांता कोठेकर. २०१६.भारतीय समाजातील स्त्रिया.नॅशनल बुक ट्रस्ट,इंडिया.
3. डॉ.दीपक पवार.२०१३. श्री साईनाथ प्रकाशन.नागपूर.
4. ची. ग .घांगरेकर.२०००. राजकीय समाजशास्त्र. दत्त सन्स प्रकाशन. नागपूर.
5. डॉ. प्रदीप आगलावे.२००३. भारतीय समाज संरचना व समस्या. श्री साईनाथ प्रकाशन. नागपूर.
6. डॉ.पु.ल.भांडारकर.१९८२. सामाजिक संशोधन पद्धती. महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ. नागपूर.